## महाराष्ट्र शासन

# राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष

८वा मजला, न्यु. एक्सलसियर
बिल्डींग, ए.के. नायक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दूरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
वेबसाईट : http://www.mahacet.org
ईमेल : maharashtra.cetcell@gmail.com

क्र.वैशिप्र-१०१९/प्र.क्र.९५/नीट-युजी २०१९/संस्था.प्रवेश प्रक्रिया/२५९३ दिनांक: ३०/०९/२०१९

प्रति,
अधिष्ठाता/प्राचार्य
खाजगी विनाअनुदानित/अल्पसंख्याक
आयुर्वेद, होमिओपॅथी व युनानी
अभ्यासक्रमाची महाविद्यालये

**विषय : नीट-युजी २०१९ प्रवेश प्रक्रिया**
**(दिनांक २६/०९/२०१९ ते ३०/०९/२०१९ दरम्यान प्रवेश रदद् केल्यामुळे रिक्त जागांवरील प्रवेशाबाबत)**

संदर्भ : राज्य सीईटी कक्षाकडील प्रसिध्द सुचना क्रमांक ४१, दिनांक १९/०९/२०१९

विषयांकित प्रकरणी कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये आयुर्वेद, होमिओपॅथी व युनानी पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेशित ज्या उमेदवारांनी त्यांचा प्रवेश दिनांक २६/०९/२०१९ ते दिनांक ३०/०९/२०१९ पर्यंत प्रवेश रदद् केला आहे किंवा प्रवेश रदद् करण्यासाठी अर्ज केला आहे अशा उमेदवारांचा प्रवेश रदद् करुन त्यांचेकडून विहीत नमुन्यातील अर्ज भरुन घ्यावा व सदर उमेदवारांकडून माहिती पुस्तिकेतील नियम क्रमांक ११.२ नुसार प्रवेश रदद् शुल्क आकारण्यात यावे. तसेच सदर रिक्त झालेली जागा ही संदर्भाधिन सुचना क्रमांक ४१ मध्ये नमूद मुद्या क्रमांक ८ नुसार दिनांक ३०/०९/२०१९ रोजी सायं. ०६.०० वाजेपर्यंत प्रलंबित उमेदवारांच्या यादीमधून भरण्यात यावी.

तसेच जे उमेदवार दिनांक २६/०९/२०१९ रोजी प्रसिध्द केलेल्या **"Not Eligible"** यादीमध्ये आहेत अशा उमेदवारांना संस्थास्तरीय प्रवेश फेरीत व पुढील होणाऱ्या कोणत्याही प्रवेश फेरीत सहभागी होता येणार नाही याची महाविद्यालयांनी नोंद घ्यावी व सदर विद्यार्थ्यास देखील याबाबत अवगत करावे.

(आनंद ए.रायते) भाप्रसे
**आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी,**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

**प्रत माहितीस्तव सादर :**
१) संचालक, आयुष संचालनालय, मुंबई